**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांचे कार्यालय,**
३०२,वेक फिल्ड हाऊस,३रामजला, ब्रिटानिया रेस्टोरंट जवळ, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट,मुंबई४००००१.
दूरध्वनी क्र.२२६१४९८४/८५,Email:ccfmmumbai@gmail.com/dcfmangrovecell@gmail.com/konkanmangroves@gmail.com

**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या
बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ८० /सन २०२१-२२.
फोर्ट, मुंबई४००००१दिनांक: ३०/११/२०२१

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकणविभाग, नवीमुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबईउपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगरपालिका आयुक्त / सहआयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/
वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **३५** वी बैठक दिनांक **२५.१०.२०२१** रोजी **विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली ऑन लाईन बैठक** घेण्यात आली.

सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त आपणास माहिती व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने इतिवृत्तातील सूचनेप्रमाणे योग्य ती कार्यवाही करुन पाणथळ तक्रारींबाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी या कार्यालयात सादर करावा, ही विनंती.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

**कोकण विभागातील पाणथळ संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची ३५ वी ऑनलाईन बैठक दि.२५.१०.२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.**

समितीचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली ऑनलाईन पध्दतीने सदरची बैठक घेण्यात आली. अध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व समितीच्या बैठकीस सुरुवात केली. सदर बैठकीस खालील अधिकारी व व्यक्ती व्हि.सीद्वारे उपस्थित होते.

| अ.क्र. | नाव | पद | कार्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्री. विलास पाटील | अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त | विभागीय आयुक्तांचे कार्यालया,कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई |
| २ | श्री. विरेन्द्र तिवारी | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, फोर्ट, मुंबई |
| ३ | श्री. राजीव निवंतकर | जिल्हाधिकारी मुंबई शहर | जिल्हाधिकारी मुंबई शहर |
| ४ | श्रीमती. निनु सोमराज | उप वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई. | कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ५ | श्रीमती निलिमा धायगुडे | अपर जिल्हाधिकारी मुंबई उपनगर | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर |
| ६ | श्री. सुदाम परदेशी | निवासी उपजिल्हाधिकारी ठाणे | जिल्हाधिकारी ठाणे |
| ७ | श्री.पद्मश्री बैनोडे | निवासी उपजिल्हाधिकारी रायगड | जिल्हाधिकारी रायगड |
| ८ | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | निवासी उपजिल्हाधिकारी सिंधुदुर्ग | जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग |
| ९ | श्री. मकरंद देशमुख | उप आयुक्त (महसूल) | विभागीय आयुक्त, कोकण विभाग, बेलापूर, नवी मुंबई. |
| १० | श्री. डी. एस. चाबुकस्वार | उप आयुक्त नवी मुंबई मनपा | उप. आयुक्त नवी मुंबई मनपा |
| ११ | निवासी जिल्हाधिकारी | निवासी जिल्हाधिकारी, वसई | जिल्हाधिकारी पालघर |
| १२ | निवासी उपजिल्हाधिकारी रायगड | निवासी उपजिल्हाधिकारी रायगड | जिल्हाधिकारी रायगड |
| १३ | निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी | निवासी उपजिल्हाधिकारी रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी |
| १४ | श्री. संजय खेडसकर | नायब तहसिलदार महसूल, रत्नागिरी | जिल्हाधिकारी रत्नागिरी |
| १५ | श्री. ए. का. संख्ये | कार्यकारी अभियंता, मुंबई महानगरपालिका | मुंबई महानगरपालिका |
| १६ | श्रीमती मनिषा प्रधान | प्रधान प्रदुषण नियंत्रण अधिकारी ठाणे महानगरपालिका | प्रदुषण नियंत्रण मंडळ, ठाणे महानगरपालिका |
| १७ | श्री. प्रमोद पाटिल | नोडल अधिकारी सिडको | सिडको |
| १८ | श्री. स्टॅलिन डी | वनशक्ती | वनशक्ती |
| १९ | श्री. महेश शिंदीकर | पाणथळ तज्ञ | कॉलेज ऑफ इंनियरींग, पुणे. |

- व्हि.सी. मधील उपस्थित काही सदस्यांचे नाम / पदनामाचा बोध होत नसल्यामुळे काही सदस्यांची नोंद केलेली नाही.

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| * | पाणथळ तक्रार निवारण समिती अंतर्गत जिल्हा/ नगरपालिका / महानगरपालिके अंतर्गत समिती गठीत करणेबाबत. | • समितीने संबंधीत जिल्हाधिकारी, महानगरपालिका व नगरपालिका यंत्रणेस पाणथळ तक्रारींबाबत प्रत्येक ग्रामपंचायत / वॉर्ड (प्रभाग) अंतर्गत १५ दिवसात समित्या गठीत करण्याच्या सूचना दिल्या जेणे करुन तात्काळ संबंधीत ठिकाणी स्थळ पाहणी करुन तक्रारींवर उचित कार्यवाही करता येईल. सदर समित्या गठीत केल्यानंतर आवश्यकता असल्यास स्थानिक पोलीस प्रशासनाची मदत घेण्याच्या सूचना दिल्या. | सर्व संबंधित महापालीका आयुक्त, मुख्याधिकारी नगरपालीका, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषदा. |
| * | नोडल अधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबत | • समितीने पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीसाठी नेमलेले प्रतिनिधी / नोडल अधिकारी (शासकीय व अशासकीय / NGO) समितीच्या बैठकीत उपस्थित राहत नसल्यामुळे काही अडचणी उद्भवतात व अशा अनुपस्थित सदस्यांची अनुपस्थिती मा. उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्याच्या सूचना सदस्य सचिवांना दिल्या. | समितीचे सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. |
| * | पाणथळ व कांदळवन तक्रारींबाबत डेब्रिज भराव हटविण्याबाबत | • पाणथळ व कांदळवन तक्रारींबाबत डेब्रिज भराव हटविण्याबाबत अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दि.१३.०७.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये प्रधान सचिव, शहर विकास विभाग, UDD-1, UDD-2 यांनी दिलेल्या आदेशानुसार कांदळवन क्षेत्रातील व त्याच्या कार्यक्षेत्रातील डेब्रिज, भराव काढून टाकण्याची जबाबदारी संबंधीत स्थानिक महानगरपालिकांची असून त्यासाठी लागणार खर्च फक्त महापालिका प्राधिकरणाद्वारे करण्याचे निर्देश दिले होते. याबाबतची कार्यवाही करण्यास संबंधीत महानगरपालिका करत नसल्यास त्याची कारणे काय आहेत याबाबतची सविस्तर माहिती मा. उच्च न्यायालयाच्या अनुपालन अहवालाद्वारे कळविण्याच्या सूचना दिल्या. त्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. | संबंधीत महानगरपालिका आयुक्त व उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.<br>सर्व म.न.पा. आयुक्त यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी था संदर्भात किमान एक उप आयुक्त दर्जाचा अधिकारी नोडल अधिकारी म्हणून नियुक्त करावा. तसेच संबंधित |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | जिल्हाधिकारी यांनी याबाबत वेळोवेळी आढावा घेवून अहवाल सादर करावा. |
| * | पोलीस व महसूल यंत्रणेमार्फत कार्यवाही करणेबाबत | • कांदळवन व पाणथळ समितीच्या तक्रारींबाबत संबंधीत जिल्हयाच्या पोलीस व महसूल यंत्रणेमार्फत पर्यावरण कायद्या अंतर्गत तक्रार दाखल करण्यात येते, परंतु FIR दाखल केल्यानंतर सदर पोलीस यंत्रणेमार्फत जेथे भराव, डंपिंग अथवा अनधिकृत कामे केली जातात ते तपासून त्यावर उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने समितीमधील सर्व सन्माननीय पोलीस आयुक्त तसेच पोलीस अधिक्षक यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करावी. याबाबत तसेच या तक्रारींचे गांर्भीर्य लक्षात घेऊन संबंधीतांवर उचित कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. | सर्व पोलीस आयुक्त तथा पोलीस अधिक्षक. |
| १ | श्री. धिरज परब:- जेसल पार्क खाडी पात्रात व किनारी कांदळवन, पाणथळमध्ये महापालिकेकडून बेकायदा नाले बांधून सांडपाणी सोडणे तसेच कचरा, निर्माल्य प्लॅस्टिक व अन्य साहित्य टाकून पर्यावरणाचा ऱ्हास.. | • या तक्रारी संदर्भात तहसिलदार ठाणे यांच्या अहवालानुसार सदर ठिकाणी सांडपाणी सोडणेकामी करण्यात आलेले नाल्याचे बांधकाम असून नव्याने नाल्याचे बांधकाम झालेले नाही.<br>• या तक्रारीबाबत जिल्हास्तरीय समितीमध्ये या तक्रारीबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.<br>• या तक्रारी संदर्भात MPCB यांचेमार्फत कोणीही प्रतिनिधी उपस्थित नव्हते. तसेच MCZMA यांचेमार्फत देखील कोणीही प्रतिनिधी अनुपस्थितीत असलेबाबत निदेर्शनास आले.<br>• त्या अनुषंगाने समितीच्या बैठकीसाठी जे सदस्य वारंवार सूचना देऊन देखील अनुपस्थित असतात, याबाबत मा. उच्च न्यायालयास कळविण्याच्या सूचना दिल्या. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. |
| २ | श्री. स्टॅलीन डी - दि.३१.०१.२०१९ Please act to stop illegal destruction of wetlands in Wadala /nearby areas. | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई शहर यांनी सदरची जागा ही सॉल्ट पॅन विभागाची असून सदर ठिकाणी ७ मोठे सर्वे नंबर असून सदरचे क्षेत्र हे वन क्षेत्र म्हणून अधिसूचीत करण्यात आले आहे. सदरचे क्षेत्र हस्तांतरीत करण्याबाबत कळविण्यात आले आहे परंतु मा. उच्च न्यायालयाच्या प्रलंबित प्रकरणांमुळे सदचे क्षेत्र हे अद्याप हस्तांतरीत करण्यात आलेले नाही.<br>• तसेच सदर ठिकाणी असलेले भराव हटविण्यासाठी | आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालीका जिल्हाधिकारी मुंबई शहर व उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | महानगरपालिकेला वारंवार सूचना देऊन सुध्दा सदरची कार्यवाही अद्याप प्रलंबित आहे.<br>• तसेच अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्देशानुसार संबंधीत महानगरपालिकेने भराव हटविण्याच्या कार्यवाही करण्याचे आदेश दिलेले आहेत.<br>• त्या अनुषंगाने समितीने मुंबई महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींना सदर जागेवरील भराव हटविण्यासाठी उचित कार्यवाही करुन अहवाल समितीकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. याबाबत सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष यांनी बृहन्मुंबई महानगरपालीका यांचेकडे पाठपुरावा करावा. | |
| ३ | श्री. सुनिल अगरवाल व श्री. स्टॅलिन डी. २४.०३.२०१९<br>Drying up of Panje Wetland in Uran & debris dumping in Bhenkhal<br>The Nature Connect Foundation: - Save Panje wetland | • तहसिलदार रायगड यांनी सदर ठिकाणी असलेले गेट खुले करण्यात आले आहेत. परंतु तेथील नागरिकांचे त्या ठिकाणी असलेले गेट पूर येत असल्यामुळे ते बंद करण्यास सांगितले.<br>• समितीच्या बैठकीमध्ये ग्रामपंचायत पाणजे यांच्याकडून दि.२४.०३.२०२१ निवदेन देण्यात आले आहे. सदर निवेदनामध्ये पाणजे येथील होल्डिंग पाँडमुळे होणारी पुरपरिस्थिती विचारात घेऊन सदर होल्डिंग पाँड खालच्या स्तराचे काही गेट उघडे ठेवण्याचे तसेच दर पावसाळयात ड्रेन पाईप उघडण्यास व पावसाळयानंतर बंद करण्याची प्रक्रीया गांवकऱ्यांनी निवेदनात नमूद केली आहे.<br>• सध्यस्थितीत सदरची तक्रार ही न्याय प्रविष्ठ असल्यामुळे मा. राष्ट्रीय हरीत न्यायालयाच्या (NGT) आदेशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.<br>• समितीने सिडको यांना सदर ठिकाणी सदरची जागा कोणत्या अटी व शर्थी देऊन ज्या यंत्रणेला विकण्यात आली आहे याबाबतची सविस्तर माहिती समितीकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. याबाबत उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सिडकोकडे पाठपुरावा करावा.<br>• तसेच सदर ठिकाणी असलेले फ्लॅप गेट खुले करण्याच्या सूचना दिल्या.<br>• तसेच भेंणखल या ठिकाणी देखील Restoration चे काम प्रलंबित आहे.<br>• पाणजे आणि भेंणखळ या तक्रारीबाबत सिडको यांना जिल्हाधिकारी | व्यवस्थापकीय संचालक, सिडको व उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | | रायगड यांनी केलेल्या स्थळ पाहणीनुसार पुन्हा तपासणी करुन १५ दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. याबाबत उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांनी सिडकोकडे पाठपुरावा करावा. | |
| ४ | श्री.धिरज परब - भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेल ग्रुपने (पॅनइंडिया) कटकारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्या प्रकरणी. | • या तक्रारीबाबत तहसिलदार ठाणे यांनी दि.१९.१२.२०२० रोजी एस्सेल ग्रुप विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे सांगितले.<br>• तसचे या बाबत दोषारोपपत्र पोलीस यंत्रणेच्या सहाय्याने MPCB यांच्यामार्फत दाखल करण्याची कार्यवाही पुर्ण करण्याच्या व केलेल्या स्थळ पाहणी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष यांनी सदर प्रकरणी वेळोवेळी लक्ष पुरवावे व संबंधित यंत्रणाशी समन्वय साधावा. | सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई |
| ५ | श्री. स्टॅलिन डी<br>दि.२०.०१.२०२०<br>Reclamation of Wetlands left from Kharigaon toll plaza as one drives from Thane to Kalyan. | • ठाणे महानगरपालिका यांच्या दि. १८.१०२०२१ रोजीच्या अहवालानुसार मौजे खारी येथील गट क्र. ७१ पै व ७३ पै या भूखंडावर अज्ञाताद्वारे भरणी झाली आहे. तक्रार स्थळी अस्तित्वातील कांदळवनाचे संरक्षण करण्यासाठी नैसर्गिक पाण्याचे प्रवाह खुले करणे आवश्यक आहे. तसेच जागेचे Restoration करण्यासाठी भरणी उचलणे आवश्यक आहे.<br>• त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी यांनी दि. ३०.०८.२०२१ च्या बैठकीमध्ये त्वरीत नैसर्गिक पाण्याचा प्रवाह खुला करणे तसेच MMRDA / METRO / MSRDC यांना भरणीची आवश्यकता असल्याने त्यांच्याशी समन्वय साधून भरणी उचलण्याचे प्रयत्न स्थानिक स्वराज्य संस्थेने करावे असे निर्देश दिले आहेत.<br>• समितीने या तक्रारीबाबत प्राधान्याने पुढील बैठकीपूर्वी सदर जागेवर ट्रेच मारुन जागेवरील भराव हटविण्याच्या सूचना दिल्या व या तक्रारीबाबत केलेल्या कार्यवाहीसाठी तयार केलेला Action Plan समितीकडे सादर करण्याच्या सूचना दिल्या. | मा.आयुक्त, ठाणे महानगरपालिका व उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ६ | श्री. सुनिल अगरवाल<br>दि.११.१०.२०२०<br>Wetland being filled up overnight Institute of Geo- magnetism campus (IIG Panvel) | • सदर ठिकाणी सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदरची जागा शासकीय असून सदरची जागा पाणथळ नाही असे सांगितले.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| | Water body | | |
| ७ | श्री. दामोदर शिंगडा - दि. २९.१२.२०२० वसई तालुक्यातील मौजे धोवली येथे पाणथळ क्षेत्रातील समुद्राला लागून असलेल्या सर्वे नं. १०९ ते सर्वे नं.११५ येथील ५० एकर पेक्षा जास्त पाणथळ तिवरे / कांदळवन कापून बेकायदा भराव केल्याबाबत. | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी पालघर व वसई-विरार महानगरपालिका यांच्या प्रतिनिधींसोबत वन विभागाच्या स्थानिक अधिकारी यांना स्थळ पाहणी करुन आवश्यक कार्यवाहीसह पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका व उपवनसंरक्षक, पालघर, सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई (जिल्हाधिकारी-पालघर-समन्वयक) |
| ८ | स्टॅलिन डी. दि.०५.०१.२०२१ Destruciton of Wetlands/CRZ violations/ Bird Trapping/ Encroachments in CRZ१ at Kharghar Sector १६ | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी रायगड व सिडको तक्रारदार यांना स्थळ पाहणी करुन आवश्यक कार्यवाहीसह पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• सदर ठिकाणी तलाव असून मासेमारीसाठी साठी त्याचा वापर केला जात असून यामुळे पाणथळ क्षेत्रांचे नुकसार झालेला नाही असे सिडको यांच्या प्रतिनिधींनी सांगितले.<br>• परंतु सदर ठिकाणी स्थळ पाहणीवेळी तक्रारदार हे उपस्थित नसल्यामुळे समितीने वन विभागाचे स्थानिक अधिकारी व तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल सादर करण्याच्या सूचना सिंडको यांच्या प्रतिनिधींना दिल्या. | उपवनसंरक्षक, अलिबाग, व्यवस्थापकीय संचालक, सिडको व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई |
| ९ | श्री.बी.एन. कुमार , दि. २२.०१.२०२१ Dangerous burial of wetlands at Ghansoli, Navi Mumbai | • या तक्रारीबाबत समितीने जिल्हाधिकारी ठाणे व उपवनसंरक्षक ठाणे यांना स्थळ पाहणी करुन आवश्यक कार्यवाहीसह दि.३० नाव्हेंबर २०२१ पर्यंत अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | उपवनसंरक्षक ठाणे व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री. स्टॅलिन डी. दि.१५.०३.२०२१ Dumping of debris on Sawarkhar wetland | • जिल्हाधिकारी रायगड यांच्या अहवालानुसार सदरची जागा ही JNPT ची असल्यामुळे सदर जागेवर अज्ञात इसमाकडून माती काढून त्या मातीचे चौरस बांध टाकून मासेमारीसाठी तलाव बनविण्यात आलेले आहे व स्पीड कंपनिच्या पाठीमागील बाजूस खाडीचा काही भाग असून त्यात डेब्रिज टाकून भराव केलेला आहे.<br>• त्या अनुषंगाने सदर ठिकाणी झालेला भराव हटविण्यासाठी उप प्रबंधक JNPT यांना उचित कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. | जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई. |
| ११ | श्री. हरीश पांडे दि. २४.०२.२०२१ Reclamation of Wetlands opposite Vithal Rakhumai temple, Dahisar East | • या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या दि. 06.09.2021 रोजीच्या अहवालानुसार सदर जागेची स्थळ पाहणी केली असता सदर जागेवर बांधकाम तसेच डेब्रिज टाकून भरणीचे काम सुरु नव्हेत. तसेच कांदळवनाची तोड झाल्याचे दिसून आलेले नाही. स्थळ पाहणी वेळी जागेवर सिमेंटचे पाईप, प्लास्टिक पाईप तसेच लोखंडी कंटेनर हे कांदळवनापासून ५० मीटरच्या आत असल्याचे दिसून आहे. प्रकरणी मंडळ अधिकारी बोरीवली यांनी गौणखनिज साठा कांदळवनापासून ५० मीटरच्या बाहेर असल्याचे कळविले आहे. तसेच अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडील दि. 05.04.2021 रोजीच्या आदेशान्वये सदर ठिकाणी गौण खनिज साठा करणेबाबत श्री. नादीर चतुरभाई चारनीया, प्रोपा. फरेन बिल्डकॉन यांना परवानगी दिलेली आहे.<br>• तसेच सदर तक्रारीच्या अनुषंगाने वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी दि.27.07.2021 रोजीच्या अहवालान्वये सदरचे क्षेत्र अधिसूचीत राखीव कांदळवन क्षेत्राचा भाग नूसन सन 2005 साली सदर जागेवर कांदळवन असल्याचे दिसून येत नाही.<br>• त्या अनुषंगाने समितीने सदरची तक्रार बंद करण्याचे निर्देश दिले. | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई |
| १२ | श्री. सुनील अगरवाल दि. 04.12.2020 Mangrove, wetlands destruction near Hiranandani Estate Thane. (कांदळवन समिती वर्ग) | • सदर ठिकाणी कांदळवन नसून सदर चे क्षेत्र हे कांदळवनापासून ५० मी अंतराबाहेर आहे. त्या ठिकाणी अस्तित्वात असलेल्या तलावाजवळ बांधकाम करण्यात आले असून तेथे सुशोभिकरणाचे काम चालू आहे.<br>• त्या अनुषंगाने समितीने वन विभागाचे स्थानिक अधिकारी व तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन केलेल्या कार्यवाहीचा स्थळ पाहणी अहवाल प्राधान्याने सादर करण्याच्या सूचना दिल्या. | आयुक्त, ठाणे महानगरपालिका व उपवनसंरक्षक ठाणे व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष. |

| | | | |
|---|---|---|---|
| १३ | श्रीमती सलुजा सुतार, अध्यक्ष अ प्रभाग समिती नवी मंबई दि.28.07.2021नेरुळ सेक्टर २७, नवी मंबई येथील नैसर्गिक पाणथळ लोटस तलावाचे संवर्धन करणेबाबत. | • या तक्रारीबाबत समितीने सिडको यांना स्थळ पाहणी करुन आवश्यक कार्यवाहीसह पुढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या.<br>• उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई यांनी याबाबत पाठपुरावा करावा. | व्यवस्थापकीय संचालक, सिडको अहवाल अप्राप्त. व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई |
| १४ | श्री. स्टॅलिन डी दि. 23.08.2021 Please stop ongoing construction inside Powai lake, Mumbai. | • सदरची तक्रार जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व बृहन्मुंबई महागनरपालिकेस पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.<br>• सदरचे क्षेत्रावजळील कामाकज बृहन्मुंबई महापालिकेमार्फत असून सदरची जागा ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे समजते.<br>• समितीने या तक्रारीबाबत बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या प्रतिनिधींसह व तक्रारदार यांच्या सोबत स्थळ पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करुन समितीच्या पूढील बैठकीपूर्वी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. | मा.आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका व सदस्य सचिव तथा उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई |

**(विलास पाटील)**
**अध्यक्ष,**
**कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती**
**तथा विभागीय आयुक्त, कोकण विभाग**